पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.
मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ०४
**सभावृत्तांत**

**दिनांक - १४/०१/२०२२** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक १४/०१/२०२२ रोजी दु. ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समितचे मा.सभापती यांचे दालनात मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
२. मा. सोनवणे शारदा हिरेन
३. मा. पाडाळे निता विलास
४. मा. बाबर शर्मिला राजू

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा. सुषमा शिंदे - सहा, आयुक्त, मा.अनिता केदारी - प्र. क्रीडा अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र.१) सावित्री बाई फुले व्यायाम शाळा से.नं.२५ निगडी प्राधिकरण येथील इमारतीमध्ये दुस-या मजल्यावरील महिला व्यायाम शाळा ओम साई महिला मंडळ,से.२८ निगडी प्राधिकरण या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभेमार्फत मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत..**

----------

खालील प्रमाणे सुचना मांडण्यात आली

सुचक - मा.सोनवणे शारदा अनुमोदक - मा.शर्मिला बाबर

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती (कार्यपत्रिका क्र.०४ ) शुक्रवार दिनांक १४/०१/२०२२ रोजीची पाक्षिक सभा दि.२८/०१/२०२२ रोजी दु.३.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

----------

सभापती - दि.२८/०१/२०२२ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( उत्तम प्रकाश केंदळे )**
**सभापती**
**मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.
कार्यपत्रिका क्रमांक - ०४
मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती
**सभावृत्तांत**

**दिनांक - २८/०१/२०२२** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक २८/०१/२०२२ रोजी दु. ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समितचे मा.सभापती यांचे दालनात मा.अवरसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
२. मा. सोनवणे शारदा हिरेन
३. मा. पाडाळे निता विलास
४. मा. बाबर शर्मिला राजू

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा. सुषमा शिंदे - सहा.आयुक्त, मा.अनिता केदारी - प्र. क्रीडा अधिकारी, मा.राजेंद्र नगापुरे - पर्यवेक्षक सभेस उपस्थित होते.

----------

१) दिनांक १०/१२/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०३) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - ०६ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २८/०१/२०२ विभाग - क्रीडा
सुचक - मा.शर्मिला बाबर अनुमोदक - मा.उत्तम केंदळे

संदर्भ - मा. शर्मिला बाबर व मा. उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सावित्री बाई फुले व्यायाम शाळा निगडी येथील इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर पुरुष व्यायाम शाळा चालविली जात आहे. दुस-या मजल्यावर रिकामा हॉल आहे.सदर रिकामा हॉलमध्ये महिला व्यायाम शाळा सुरु करणेबाबत ओम साई महिला मंडळ से.२८

निगडी प्राधिकरण यांची मागणी आहे. तरी सावित्री बाई फुले व्यायाम शाळा से.ने.२८ निगडी प्राधिकरण या संस्थेस ११ महिने कराराने म.न.पा.कडून दरमहा सेवा शुल्क र.रु.२०००/- देऊन सेवाशुल्क तत्वावर कराराने चालविण्यास देण्याच्या मान्यतेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे,

सदर ठराव सर्वानुमते मान्या झाला

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( उत्तम प्रकाश केंदळे )**
**सभापती**
**मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३६/२०२२
दिनांक - ३१/०१/२०२२



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना